# दि हस्ती को-ऑप. बँक लि.

''हस्ती सहकार दीप'', दोंडाईचा जि. धुळे, फोन ०२५६६ - २९९३०७ / २९९४७६

## स्थावर मिळकत जाहीर विक्री नोटीस

मी खालील सही करणार, **SARFAESI ACT 2002** नुसार नियुक्त प्राधिकृत अधिकारी दि हस्ती को-ऑप बँक लि.दोंडाईचा, जि.धुळे, मला मिळालेल्या अधिकारानुसार खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत जशी आहे जेथे आहे तत्वार विक्री करण्यासाठी तमाम जनतेकडून सिलबंद निविदा मागवित आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**कर्जदाराचे नाव - श्री. गोविंदराव भास्कर साळुंके**

**तारण ठेवणारे मिळकत धारक / स्वतः कर्जदाराचे नाव -** श्री.गोविंदराव भास्कर साळुंके १) मु.पो.इंदवे ता.साक्री जि.धुळे. २) रा.प्लॉट नं.७, हरचंद नगर, दोंडाईचा ता.शिंदखेडा जि.धुळे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन -** मौजे-हरचंद नगर, दोंडाईचा ता.शिंदखेडा जि.धुळे येथील स.नं.९८ पैकी प्लॉट नं.०७ चे एकुण क्षेत्रफळ १५०.०० चौ.मी. त्यापैकी बांधीव घराचे क्षेत्रफळ ५०.६० चौ.मी. (नगरपरिषद नविन घर नं. Z२०००४३५ व जुना नं.१२५०) असलेल्या बांधीव घराचा जागेसह यांसी चतुःसिमा- पुर्वेस- प्लॉट नं.८, पश्चिमेस- प्लॉट नं.६, दक्षिणेस- कॉलनी रस्ता, उत्तरेस- स.नं.१०४ चा भाग.

| राखीव किंमत | रुपये - २६,२५,६००/- |
|---|---|
| अनामत रक्कम व ती जमा करण्याची शेवटची तारीख / वेळ व कोणाकडे जमा करावयाची तो पत्ता | अनामत रक्कम<br>राखीव किंमत: रुपये- २६,२५,६००/- ; अनामत रक्कम: रुपये- २,६२,५६०/-<br>**इच्छुक खरेदीदार मिळकतीसाठी निविदा दाखल करु शकतात व त्या अनुषंगाने वर निर्देशित केल्याप्रमाणे संबंधीत मिळकतीसाठीची अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा दि.१२/०९/२०२४,गुरुवार रोजी दुपारी ०१:०० वाजेपर्यंत दि हस्ती को-ऑप.बँक लि. दोंडाईचा शाखा-दोंडाईचा येथे जमा करावी.** |
| बँकेस ज्ञात असलेले इतर बोजे | नाही |
| निविदा उघडण्याची व लिलावाची तारीख / ठिकाण व वेळ | दि.१२/०९/२०२४, गुरुवार रोजी दुपारी ०२:३० वाजता दि हस्ती को-ऑप.बँक लि. शाखा-दोंडाईचा स्टेशन भाग, दोंडाईचा जि.धुळे |
| कर्जाची थकीत रक्कम | कर्जदाराचे नाव - **श्री. गोविंदराव भास्कर साळुंके** यांचे कडील दि.३१/०७/२०२४ अखेर थकीत कर्ज रक्कम रु.९,५०,७७९/- अधिक दि.०१/०८/२०२४ पासून ते कर्ज फिटे पर्यंतचे व्याज अधिक इतर खर्च. |

**नियम व अटी :-** १) वर नमुद स्थावर मिळकत विकत घेण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींनी श्री.ए.जे.मराठे, शाखा व्यवस्थापक दि हस्ती को-ऑप.बँक लि. मुख्य शाखा-दोंडाईचा ''हस्ती सहकार दीप'' स्टेशन भाग, दोंडाईचा जि.धुळे (मोबाईल नंबर-८८८८९१६४४ / ०२५६६-२९९२०६) यांचेशी कार्यालयीन वेळेत अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. **२)** मिळकत खरेदीसाठी बँकेचा नावांचा धनाकर्ष (डी.डी.) किंवा NEFT / RTGS द्वारे Beneficiary Name- THE HASTI CO.OPERATIVE BANK LTD. Account No- 00010380000348, IFSC Code-HDFC0000060 Bank Name-HDFC BANK LTD Branch-MUMBAI व स्वतःचे पॅनकार्डची व आधार कार्डची स्व-साक्षांकीत प्रत यासह जमा करावी. ''सिलबंद पाकीटावर श्री.गोविंदराव भास्कर साळुंके'' यांची स्थावर मिळकत घेण्यासाठी निवीदा असे स्पष्टपणे नमुद करुन वरील पत्यावर सादर करावयाची आहे. अपात्र निविदा धारकाची इसारा रक्कम निविदा उगडल्यापासून ७ दिवसांनी परत केली जाईल. **३)** सदर सिलबंद निविदा दि.१२/०९/२०२४,गुरुवार रोजी दुपारी २:३० वाजता उघडण्यात येतील व ज्या व्यक्तींनी निविदा भरलेल्या आहेत त्या व्यक्तींनाच निविदा उघडण्याच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येईल. सदरच्या निविदा उघडल्यानंतरही ज्या व्यक्तींची निविदा रक्कमेपेक्षा जास्त किंमतीत सदरची स्थावर मिळकत विकत घेण्याची इच्छा असेल त्या व्यक्ती त्यांचा प्रस्ताव प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर ठेवू शकतात आणि हा प्रस्ताव आलेल्या निविदांपेक्षा जास्त रकमेचा असेल तर हा प्रस्ताव विचारात घेतला जाईल. **४)** ज्या व्यक्तींची निविदा / प्रस्ताव मान्य केला जाईल त्यांनी इसाऱ्याची रक्कम धरुन विक्री किंमतीच्या (मंजुर प्रस्तावाच्या) एकूण विक्री किंमतीच्या २५%रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याकडे त्याच वेळी भरणे आवश्यक आहे. तसेच उर्वरीत ७५% रक्कम सदरचा लिलाव कायम झाल्यापासून १५ दिवसाच्या आत जमा करण्यात यावी. संपुर्ण कर्ज रकमेचा भरणा केल्याशिवाय स्थावर मालमत्तेचा ताबा देण्यात येणार नाही. **५)** मिळकत खरेदी करणाऱ्या इसमाने जर मिळकतीची उर्वरीत ७५% रक्कम विहीत मुदतीत भरली नाही तर इसाऱ्यापोटी भरलेली २५% रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांना असेल तसेच मालमत्ता पुनश्च विक्री केली जाईल. **६)** विक्री करारनामा / विक्री प्रमाणपत्र नोंदणीकृत करण्यासाठी लागणारा नोंदणीचा स्टॅम्प, नोंदणी फी व इतर अनुषंगिक खर्च स्थावर मिळकत विकत घेणाऱ्याने करावयाचा आहे. तसेच सदर मिळकतीबाबत बाकी असलेले कोणतेही सरकारी, निमसरकारी कर अथवा देणी घेणी विकत घेणाऱ्याने अदा करावयाची आहे, त्याची जबाबदारी बँकेवर नाही सदरची स्थावर मिळकत नांवावर वर्ग करण्याचा खर्च देखील विकत घेणाऱ्याने अदा करावयाचा आहे. प्राधिकृत अधिकारी केवळ विक्रीचे प्रमाणपत्र देतील त्या व्यतिरिक्त इतर अटी व शर्ती निविदा उघडण्याचा वेळी वाचण्यात येतील अंतिम विक्री किंमत ठरविण्याचे अथवा कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांनी राखुन ठेवलेले आहेत आणि याबाबतीत त्यांचा निर्णय अंतिम राहील. राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीचा निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. **७)** वरील सर्व अटी व शर्ती मध्ये नविन अटी व शर्ती समाविष्ठ करणे अथवा काढून टाकणेच्या हक्क राखून ठेवण्यात आलेला आहे. तसेच यथास्थितीत परिस्थितीनुसार बदल करण्यात येईल.

**नोंद :-** उपरोक्त नमुद स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा बँकेकडे आहे.

**सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत कायदेशीर विक्री सुचना :-** कर्जदार, तारण मिळकतधारक व जामीनदार यांना नोटीस देण्यात येत आहे की, त्यांनी स्थावर मिळकतीचा लिलाव होण्यापूर्वी आपल्या थकीत कर्ज रक्कमा बँकेस अदा कराव्यात अन्यथा तारण स्थावर मिळकतीचा लिलाव बँकेच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल. स्थावर मिळकतीचा आरक्षित किंमतीबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. संबंधीत कर्जदार, तारण मिळकत धारक व जामीनदारांनी ही नोटीस कायदेशीर विक्रीची सुचना समजावी. तसेच उपरोक्त तारखेस होणाऱ्या जाहीर विक्री लिलावास आपण देखील उपस्थित रहावे अन्यथा आपल्या उपरोक्ष जाहीर विक्री लिलावाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.

येणेप्रमाणे लिलावाच्या अटी व शर्ती उपस्थितांना व लिलावात भाग घेणाऱ्यांना वाचून दाखविण्यात येतील व त्यांचा मान्यतेच्या सह्या घेण्यात येतील.

**(जी. डी. ठोके)**
**प्राधिकृत अधिकारी**

**दिनांक - २६- ०८ -२०२४**
**ठिकाण - दोंडाईचा**

**दि. हस्ती को - ऑप बँक लि. मुख्य कार्यालय, दोंडाईचा जि. धुळे**